Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# बीड जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळण सुविधांचा भौगोलिक अभ्यास

**डॉ. राजपंगे एम.जी.**
भूगोल विभाग
आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा
ता. आष्टी, जि. बीड

**प्रस्तावना:**

वाहतूक व दळणवळन हा घटक कोणत्याही प्रदेशाच्या विकासामध्ये अत्यंत महत्वाचा घटक आहे. परंतु हा जिल्हा वाहतूक आणि दळणवळनाच्या क्षेत्रात फारसा प्रगतशिल नाही, बीड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने वाहतूकीमध्ये रस्त्यांची भूमिका महत्वाची आहे.

**अभ्यासक्षेत्र:**

बीड जिल्हा मराठवाड्याच्या मध्यस्थानी आहे. बीड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२७’ उत्तर ते १९°२७’ उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार ७४°४९’ पूर्व ते ७६°४४’ पूर्व रेखांश असा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना, पूर्वेस परभणी व लातूर हे जिल्हे आहेत. दक्षिणेस उस्मानाबाद व अहमदनगर तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०६९४ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३.४७% एवढे आहे. जनगणना २०११ नुसार जिल्ह्याची लोकसंख्या २५,८५,०४९ होती. जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत.

बीड जिल्ह्यात एकुण १३६८ गावे आहेत. तसेच जिल्ह्यात एक नगरपंचायत केज येथे आहे. जिल्ह्यात एकूण ११ कृषी उत्पन्न बाजार समित्या असून बीड, गेवराई, माजलगांव, अंबाजोगाई, केज, धारुर, पाटोदा, आष्टी, शिरुर, परळी व वडवणी या तालुक्यात प्रत्येकी एक या प्रमाणे आहेत

**रस्ते वाहतूक :**

बीड जिल्ह्यात रस्ते वाहतुक हीच एकमेव सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्ते इ. चा समावेश होतो. तर रेल्वे वाहतूक जिल्ह्याच्या पूर्व भागात म्हणजेच परळी तालुक्यात कमी प्रमाणात उपलब्ध आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतुकीचा तपशील तक्ता १ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक (सन १९९१ व २०१५)**

| अ. क्र. | मार्गाचे नांव | रस्त्यांची लांबी कि.मी. मध्ये | |
|---|---|---|---|
| | | १९९१ | २०१५ |
| १ | राष्ट्रीय महामार्ग | - | १८८ |
| २ | राज्य महामार्ग | ९१९.६४ | १००३ |
| ३ | प्रमुख जिल्हा रस्ते | २८६७.०८ | ३४४९ |
| ४ | ग्रामीण रस्ते | १५३६.८९ | ४८१२ |
| एकूण | | ५३२३.५८ | ९४५२ |

स्त्रोत: बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन - १९९१ व २०१५

तक्ता क्र. ३.४ नुसार बीड जिल्ह्यातील सन १९९१ व २०१५ या वर्षीची रस्ते वाहतूकीची माहिती दिलेली आहे. सन १९९१ ला बीड जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी ५३२३.५८ किमी. तर सन २०१५ मध्ये ९४५२ किमी लांबी होती. सन १९९१ ला जिल्ह्यात राज्य महामार्ग (९१९.६४ किमी), जिल्हा प्रमुख रस्ते (२८६७.०८ किमी) व ग्रामीण रस्ते (१५३६.८९ किमी) होते तर सन २०१५ मध्ये राष्ट्रीय महामार्ग (१८८ किमी.), राज्य महामार्ग (१००३ किमी) प्रमुख जिल्हा रस्ते (३४४९ किमी) व ग्रामीण रस्ते (४८१२ किमी) होते.

**लोहमार्ग :-**

बीड जिल्ह्यात दक्षिण मध्य रेल्वे विभागाचा लोहमार्ग ४७.८६ किमी असून तो अंबाजोगाई व परळी तालुक्यातून जातो.


बीड जिल्हा
वाहतूक व दळणवळण
सूची
राष्ट्रीय महामार्ग
राज्य / जिल्हा / इतर महामार्ग
लोहमार्ग
N
० १० २० कि.मी.
गेवराई
बीड
माजलगाव
धारूर
अंबाजोगाई
परळी
केज
पाटोदा
आष्टी
शिरूर-कासार
वडवणी

हा लोहमार्ग ब्रॉडगेज असून यापैकी ४०.३८ किमी हा परळी-हैद्राबाद मार्गावर आहे तर ७.४८ किमी मार्ग परळी-परभणी मार्गावर आहे. २२० कि.मी. चा अहमदनगर - बीड - परळी हा नवीन लोहमार्ग बांधण्याचे काम युध्दपातळीवर चालू असून सन २०१९ पर्यंत ते पूर्ण शासनास्तरावर प्रस्तावित आहे. त्याशिवाय जिल्ह्यात इतरत्र कोणताही लोहमार्ग नाही. बीड जिल्ह्यात हवाई मार्ग व जलमार्ग नाहीत. बीड जिल्ह्यातील मालवाहतूकीसाठी रेल्वेमार्गाची सुविधा मोठ्या प्रमाणात नसल्याने वाहतूक ही प्रामुख्याने रस्ते मार्गावरुन होते. जिल्ह्यात विमान व जलवाहतूक उपलब्ध नाहीत.

दळणवळण व संदेशवहनाच्या बाबतीत म्हणावा तसा विकास झालेला नाही. म्हणून या सर्वांचा परिणाम बीड जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर झालेला दिसून येतो.

**संदर्भः**

१) बीड जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, १९९१, २००१, २०१५.
२) बीड जिल्हा - गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई
३) लोकराज्य : माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
४) डॉ. व्ही. टी. घारपुरे (२००४): लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
५) डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ शहापूरकर (२००६): वस्ती भूगोल, विदयाभारती प्रकाशन, लातूर.
६) डॉ. दाते व सौ दाते (२०१०): प्राकृतिक भूगोल, विद्याा प्रकाशन, नागपुर
७) प्रा. डॉ. जगदिश सिंह (२००१): संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.
८) डॉ. सुरेश फुले (२००५): कृषी भूगोल, विद्या प्रकाशन, लातूर.